**नियमित दिवाणी दावा नं.४६/२०१३ मधील निशाणी ४८ खालील आदेश**

१) वादीने सदरचा अर्ज उशिरा माफी होवुन मिळावी म्हणुन दाखल केलेला आहे. सदर अर्जावर प्रतिवादींनी म्हणणे दाखल करून विरोध केलेला आहे.

२) वादी व प्रतिवादी यांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले. खालील वाद प्रश्नांचे उत्तर कारणांसह देत आहे ते खालीलप्रमाणे.

| | **वाद प्रश्न** | **उत्तर** |
|---|---|---|
| १. | वादीने अर्जाच्या विलंब माफीसाठी योग्य व संयुक्तिक कारण दिले आहे का ? | ... **होय.** |
| २. | काय आदेश ? | ... **अंतिम आदेशानुसार** |

**कारणमिमांसा**

**वाद प्रश्न क्र. १ चे उत्तर**

३) यात वादीने अर्जात कथन केलेले आहे की, दावा चालु असताना प्रतिवादी नं. ४ हे दि. २९.०७.२०१६ रोजी, प्रतिवादी नं. ६ दिनांक ३०.०५.२०१६ रोजी मरण पावलेले आहेत. त्यासंबंधी प्रतिवादीने वादीस माहिती दिली नाही. त्याबाबत वादीने वारसासाठी अर्ज दिलेला आहे. परंतु ते मरण पावल्यापासुन ९० दिवसांच्या आंत वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते. परंतु तसा अर्ज दाखल केलेला नाही, त्यामुळे त्यास विलंब झालेला आहे. त्यामुळे झालेला विलंब माफ करून मिळावा अशी मागणी केलेली आहे.

४) प्रतिवादींचे कथन की, वादीने दि. २०.१०.२०१६ रोजी अर्ज दिलेला होता, तो नामंजुर झालेला आहे. त्यामुळे दावा हा त्या प्रतिवादीविरूध्द ९० दिवसांत वारस रेकॉर्डवर घेतलेले नाही म्हणुन त्यांच्याविरूध्द दावा अबेट

झालेला आहे. ते रद्द करून मागितलेले नाही, त्यास उशिर झालेला आहे. तरी अर्ज नामंजुर करावा अशी मागणी केलेली आहे.

५) वादी, प्रतिवादी यांच्या कथनांचा विचार करता दाव्याच्या दरम्यान प्रतिवादी नं. ४ व ६ हे दाव्याच्या दरम्यान मरण पावलेले आहेत. ते मरण पावल्यापासुन वेळेत वादीने त्यांचे वारस रेकॉर्डवर आणलेले नाहीत. त्यामुळे त्यास विलंब झालेला आहे. विलंब माफीसाठी वादीने अर्जास योग्य कारण दिलेले आहे. सबब वरील गोष्टीचा विचार करता दाव्याचा अंतिम निर्णय करण्यासाठी सदर प्रतिवादींचे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. सबब या व वरील कारणास्तव मी वाद प्रश्न क्रमांक १ चे उत्तर 'होय' असे देत आहे.

**<u>वाद प्रश्न क्रमांक २ बाबत</u>**

६) या वाद प्रश्नाच्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. वादीचा अर्ज निशाणी ४८ मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीस प्रतिवादी नं. ४ व ६ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब हा माफ करण्यात येत आहे.

( **एस. एस. इंदलकर** )
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
माळशिरस.

दिनांक : १६.०२.२०१७.

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this PDF file Order is same word to word as per the original Order.

(a) Name of the Stenographer : **S. M. Malkapalli**

(b) Court : **Civil Court Senior Division, Malshiras.**

(c) Order signed by P.O. on : **16.02.2017.**

(d) Order uploaded on : **16.02.2017.**